वाचा :- १) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील ज्ञापन शिक्षण/प्राथ-९/२५९/२०१० दि.७/७/२०१०

२) गटशिक्षण अधिकारी पं.स.नाशिक यांचेकडील पत्र क्र पसना/शिक्षण/अस्था-२/४९५/१० दिनांक १८/११/२०१०

३) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/४३२/२०१५ नाशिक दि.१७/८/२०१५

४) सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर २०७/१५ दि.२२/२/१६

५) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/२८५/१७ दिनांक ४/११/२०१६

६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचे दालनात सुनावणी दिनांक २४/७/२०१७

६) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :-

---

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

**आदेश**

जा.क्र.शिक्षण/प्राथ-९/ ५४८ /२०१७

नाशिक दिनांक: 26 /08 /२०१७

ज्याअर्थी श्रीम.अनुरेखा रमेश साळवे,प्राथमिक शिक्षिका जि.प.शाळा बेलतगव्हाण ता.नाशिक येथे काम करीत असतांना दिनांक १/९/२००१ पासून आज पावेतो अनाधिकृत गैरहजर राहिल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नूकसान होत असल्याने,त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा , जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे कलम ३ चा भंग केला आहे.

ज्याअर्थी श्रीम.अनुरेखा रमेश साळवे, प्राथमिक शिक्षिका यांनी शासकिय कामकाजात गैरवर्तणूक व नियम बाहय वर्तन केल्याने या व्दारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे कलम ३ चा भंग केल्याचे गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नाशिक यांनी निदर्शनास आणून दिल्याने या कार्यालयाचे पत्र क्रमांक /प्राथ-९/२५९/२०१० दि.७/७/२०१० नुसार ज्ञापन देऊन खुलासा मागविण्यात आला होता.

ज्याअर्थी श्रीम.अनुरेखा रमेश साळवे, प्राथमिक शिक्षिका यांनी सदर ज्ञापनास विहीत मुदतीत खुलासा सादर केला नसल्याने त्यांचे विरुध्द् महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे कलम ६ नुसार या कार्यालयाचे पत्र क्र शिक्षण/प्राथ-९/४३२/२०१५ दि.१७/८/२०१५ नुसार सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांची नियुक्ती करण्यात आली होती.

ज्याअर्थी चौकशी अधिकारी यांनी प्रकरणी सखोल चौकशी करता श्रीम.अनुरेखा रमेश साळवे, प्राथमिक शिक्षिका यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसले बाबतचा अहवाल त्यांचेकडील पत्र क्रमांक विशा/खाचौ/सी.आर./२०७/१५ दिनांक २२/२/२०१६ रोजीच्या अहवालान्वये सादर केलेला आहे. श्रीम.साळवे प्रा.शि.यांची दिनांक १/९/२००१ पासूनची अनाधिकृत गैरहजेरी ही समर्थनीय नसल्याने श्रीम.अनुरेखा रमेश साळवे, प्राथमिक शिक्षिका यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे, श्रीम.अनुरेखा रमेश साळवे, प्राथमिक शिक्षिका यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग २ मधील नियम ४(४) नुसार त्यांना सध्याच्या पदावरील वेतनश्रेणीतील मूळवेतनावर का आणू नये ?तसेच अनाधिकृत गैरहजर कालावधी (दिनांक १/९/२००१ पासून ते हजर होण्याच्या दिनांका पावेतो) सेवा निवृत्ती वेतनासह सर्वप्रयोजनार्थ म.ना.से.(रजा) नियम १९८१ चे नियम ६३ (३) अन्वये विनावेतन (अकार्यदिन) म्हणून मंजूर का करण्यात येवू नये ? याबाबत अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/२८५/२०१७ दि.८/४/२०१७ अन्वये देण्यांत येवून त्याबाबतचा खुलासा २१ दिवसांच्या आंत सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

ज्याअर्थी प्रस्तुत अंतिम कारणे दाखवा नोटीस पत्रास श्रीम.अनुरेखा रमेश साळवे , प्राथमिक शिक्षिका यांनी दिनांक २५/४/२०१७ रोजी खुलासा सादर केला आहे. श्रीम.अनुरेखा रमेश साळवे,प्राथमिक शिक्षिका यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने तसेच आपणास माझे दालनात सदर प्रकरणी दिनांक २४/७/२०१७ रोजी सायं.५.०० वाजता सुनावणी घेऊन आपणास बचावा बाबत अंतीम संधी देण्यात आली होती.आपण आपली बाजु समर्पक पणे मांडू शकले नसल्याने आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द होते.

त्याअर्थी श्रीम.अनुरेखा रमेश साळवे,प्राथमिक शिक्षिका यांना त्यांचेविरुध्द्चे खातेचौकशी प्रकरणी शासन होणेबाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग २ मधील नियम ४ (४) नुसार श्रीम.अनुरेखा रमेश साळवे, प्राथमिक शिक्षिका यांना सध्याच्या पदावरील वेतनश्रेणीतील मूळवेतनावर आणण्यात येत आहे. तसेच अनाधिकृत गैरहजर कालावधी (दिनांक १/९/२००१ पासून ते हजर होण्याच्या दिनांका पावेतो) सेवा निवृत्ती वेतनासह सर्वप्रयोजनार्थ म.ना.से.(रजा) नियम १९८१ चे नियम ६३ (३) अन्वये विनावेतन (अकार्यदिन) म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.अनुरेखा रमेश साळवे, प्राथमिक शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकांत घेण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति, श्रीम.अनुरेखा रमेश साळवे , प्राथमिक शिक्षिका जिल्हा परिषद शाळा बेलतगव्हाण ता.नाशिक
व्दारा : गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती नाशिक

प्रत:- गटशिक्षणअधिकारी पंचायत समिती नाशिक.

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असून त्यापैकी १ प्रत श्रीम.अनुरेखा रमेश साळवे, प्राथमिक शिक्षिका यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

प्रत:- प्राथमिक -९ शिक्षण विभाग जि.प.नाशिक

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद नाशिक

वाचा :- १) गट शिक्षण अधिकारी,पं.स.पेठ यांचे कडील पत्र क्रमांक पसपे/आ-१/६६१/२०११ दिनांक १०/६/२०११
२) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील ज्ञापन शिक्षण/प्राथा-९/५९/२०१२ दि.१७/४/२०१२
३) मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/८२६/२०१५ दिनांक २४/८/२०१५
४) सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील अहवाल क्र.विशा-४/खाचौ/सीआर /२०९/२०१५ दिनांक १२/४/२०१६
५) या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/६६७/२०१६ दि.८/१२/२०१६
६) गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती पेठ यांचे कडील पत्र क्रमांक पसपे/शिक्षण/आस्था-१/१४४/१७ नाशिक दिनांक १३/२/२०१७
७) श्री.लक्ष्मण नवसु खाडम जि.प.प्राथ.शाळा लव्हाळी ता.पेठ यांचा खुलासा दिनांक २/२/२०१७
८) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नाशिक यांचे दालनात झालेली सुनावणी दिनांक २४/७/२०१७
९) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक / /२०१७

---

**आदेश**

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
जा.क्र.शिक्षण/प्राथ-९/५४९/२०१७
नाशिक दिनांक 26/08/२०१७

ज्याअर्थी श्री.लक्ष्मण नवसू खाडम प्राथ शिक्षक जिल्हा परिषद शाळा लव्हाळी ता.पेठ येथे काम करीत असतांना शासकिय कामकाजात गैरवर्तणूक व नियमबाहया वर्तन केल्याने संदर्भ क्र.१ गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती पेठ यांचे कडील पत्र क्रमांक पसपे/आ-१/६६१/२०११ दिनानक ३०/१/२०१५ अन्वये श्री.खाडम यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी दोषारोप पत्र क्र.१ ते ४ सादर करण्यात आले होते.

ज्याअर्थी श्री.लक्ष्मण नवसू खाडम प्राथ शिक्षक यांना संदर्भ क्र.२ मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/५९/२०१२ दिनांक १७/४/२०१२ अन्वये ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्र.१ ते ४ बजाविण्यात आले असुन सदर ज्ञापनास श्री.खाडमम यांनी खुलासा सादर केलेला नाही.

ज्याअर्थी श्री.खाडम प्राथ.शिक्षक यांनी ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला खुलासा सादर केलेला नसल्याने संदर्भ क्र.३ अन्वये मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्राथ-९/८२६/२०१५ दिनांक २४/८/२०१५ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

ज्याअर्थी सहाय्याक आयुक्त (चौकशी) यांनी सविस्तर चौकशी करुन मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी संदर्भ क्र.४ अन्वये क्र.विशा ४/खाचौ/सीआर/२०९/२०१५ दिनांक १२/४/२०१६ रोजीच्या अहवालान्वये श्री.लक्ष्मण नवसू खाडम यांचे वर आरोप क्र.१) अनाधिकृत गैरहजर राहणे २) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नूसकसान करणे ३) शालेय अभिलेखे अपूर्ण ठेवले / बँक पासबुक व आर्थिक शालेय अभिलेखे स्वत:च्या घरी ठेवले बाबत हे तीन आरोप सिध्द होत असल्याने, श्री.लक्ष्मण नवसू खाडम प्राथ शिक्षक यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ४ (७) नुसार श्री.खाडम यांना जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फे का करण्यात येवू नये ? या बाबत अंतीम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/५०४/२०१६ दिनांक ६/१०/२०१६ अन्वये देण्यात येवून त्या बाबत खुलासा २१ दिवसाच्या आत सादर करणे बाबत कळविण्यात आलेले होते.

ज्याअर्थी लक्ष्मण नवसू खाडम प्राथ शिक्षक यांनी अंतीम कारणे दाखवा नोटीसीस दिनांक २/२/२०१७ रोजी खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलासा मुदतीत व असमाधानकारक असल्याने तसेच आपणास माझे दालनात सदर प्रकरणी दिनांक २४/७/२०१७ रोजी सायं.५.०० वाजता सुनावणी घेऊन आपणास बचावा बाबत अंतीम संधी देण्यात आली होती.आपण आपली बाजु समर्पक पणे मांडू शकले नसल्याने आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द होते.

त्याअर्थी श्री.लक्ष्मण नवसू खाडम प्राथ शिक्षक यांना त्यांचे विरुध्द खाते चौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधीकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारा अन्वये श्री.खाडम प्राथमिक शिक्षक यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ४ (७) नुसार जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फे करण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाची नोंद श्री.लक्ष्मण नवसू खाडम प्राथ शिक्षक यांचे मुळसेवा पुस्तकात घेण्यात यावी.

Deepa 26/08
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति,

श्री.लक्ष्मण नवसू खाडम ,प्राथमिक शिक्षक जिल्हा परिषद शाळा लव्हाळी ता.पेठ
व्दारा : गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती पेठ

प्रत:- गटशिक्षणअधिकारी पंचायत समिती पेठ.
२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्री.लक्ष्मण नवसू खाडम,प्राथमिक शिक्षक यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

प्रत:- प्राथमिक -९ शिक्षण विभाग जि.प.नाशिक

Deepa 26/08
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद नाशिक

वाचा :- १) गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती पेठ यांचे कडील पत्र क्र. पसपे/आ-१/१५१/२०१४ दिनांक २०/१/२०१४
२) मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/१३३/२०१४ दि.३/३/२०१४
३ ) मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्राथ-९/१७६/१५ दि.१०/३/२०१५
४) सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील अहवाल क्र.विशा ४/खाचौ/ सीआर १६०/२०१५ दि.६/६/२०१५
५) या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/४९९/२०१६ दि.६/१०/२०१६
६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचे दालनात दिनांक २४/७/२०१७ रोजी झालेली सुनावणी.
६) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक / /२०१७

---

आदेश

शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक
जा.क्र./शिक्षण/प्राथ-९/५४५/२०१७
दिनांक ४/०८/२०१७

ज्याअर्थी श्री.अरुण भगवान चव्हाण प्राथ.शिक्षक जिल्हा परिषद शाळा कासटविहीर ता.पेठ येथे काम करीत असतांना दिनांक १९/६/२०१३ पासून ते आजतागायत कोणत्याही प्रकारची पूर्वपरवानगी न घेता अनाधिकृत गैरहजर राहून कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण करणे, कर्तव्यात कसूर केल्याने संदर्भ क्र.१ गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती पेठ यांचे कडील पत्र क्रमांक पसपे/आ-१/१५१/२०१४ दिनांक २०/१/२०१४ अन्वये श्री.चव्हाण यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी दोषारोप पत्र क्र.१ ते ४ सादर करण्यात आले होते.

ज्याअर्थी श्री.अरुण भगवाण चव्हाण प्राथ.शिक्षक यांना संदर्भ क्र.२ मा.मु.का.अ. जि.प.नाशिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/१३३/२०१४ दि.३/३/२०१४ अन्वये यांचे ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ बजाविण्यात आले असुन सदर ज्ञापनास खुलासा सादर केलेला नाही.

ज्याअर्थी श्री.चव्हाण प्राथ.शिक्षक यांनी ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला विहीत मुदतीत खुलासा सादर केलेला नसल्याने संदर्भ क्रमांक ३ अन्वये मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/१७६/२०१५ दि.१०/३/२०१५ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

ज्याअर्थी सहाय्यक आयुक्त (चौकशी) तथा चौकशी अधिकारी यांनी श्री.चव्हाण प्रा.शि.यांचे विरोधात असलेले आरोप १) शालेय कामी सतत अनाधिकृत गैरहजर राहणे २) मुलांचे शैक्षणिक नूकसान केले बाबत ३) शालेय चार्ज न देणे बाबत सविस्तर चौकशी करुन त्यांनी संदर्भ क्र.४ क्र.विशा ४/खाचौ/सीआर/१६०/२०१५ दिनांक ६/६/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे. उक्त चौकशी अहवालावरुन १) शालेय कामी सतत अनाधिकृत गैरहजर राहणे २) मुलांचे शैक्षणिक नूकसान केले बाबत ३) शालेय चार्ज न देणे बाबत हे तीन आरोप सिध्द होत असल्याने श्री.अरुण भगवान चव्हाण प्राथ शिक्षक यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे, असा निष्कर्ष काढल्याने श्री.अरुन भगवान चव्हाण प्राथ शिक्षक याना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ४(७)नुसार त्यांना जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ का करण्यात येवू नये ? तसेच अनाधिकृत गैरहजर कालावधी दिनांक ६/९/२०१२ ते दिनांक ७/९/२०१२ दिनांक २७/११/२०१२ ,दिनांक १६/१२/२०१२, दि.१९/६/२०१३ ते आजतागायत सेवा बाहय कालावधी का धरण्यात येवू नये ? या बाबत संदर्भ क्र.५ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/४९९/२०१६ दिनांक ६/१०/२०१६ अन्वये देण्यात येवून त्या बाबतचा खुलासा २१ दिवसाच्या आत सादर करणे बाबत कळविण्यात आले होते.

ज्याअर्थी अंतीम कारणे दाखवा नोटीस पत्रास श्री.अरुण भगवान चव्हाण प्राथ शिक्षक यांनी दि. ३०/१/२०१७ रोजी खुलासा सादर केलेला आहे. श्री.चव्हाण यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने तसेच आपणास माझे दालनात सदर प्रकरणी दिनांक २४/७/२०१७ रोजी सायं.५.०० वाजता सुनावणी घेऊन आपणास बचावा बाबत अंतीम संधी देण्यात आली होती.आपण आपली बाजु समर्पक पणे मांडू शकले नसल्याने आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द होते.

त्याअर्थी श्री.अरुण भगवान चव्हाण प्राथ.शिक्षक यांना त्यांचे विरुध्द खाते चौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये श्री.अरुण भगवान चव्हाण प्राथमिक शिक्षक यांना जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.अरुण भगवान चव्हाण प्राथमिक शिक्षक यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति, श्री.अरुण भगवान चव्हाण ,प्रा.शि.जि.प.शाळा कासटवीहीर ता.पेठ

प्रतः- गटशिक्षणअधिकारी पंचायत समिती पेठ.

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्री.अरुण भगवान चव्हाण , प्राथमिक शिक्षक यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

प्रतः- प्राथमिक -९ शिक्षण विभाग जि.प.नाशिक

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

वाचा :- १) या कार्यालयाचे आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/३६८/२०११ नाशिक दिनांक ३०/९/२०११
२) या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक /शिक्षण/प्राथ-९/६०/२०१२ नाशिक दिनांक २८/३/२०१२
३) या कार्यालयाचा आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/७६०/२०१३ नाशिक दिनांक १३/१२/२०१३
४) मा.अप्पर आयुक्त,नाशिक विभाग नाशिक यांचेकडील निकालपत्र दिनांक ३०/११/२०१५
५) या कार्यालयाचा आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/१७२/२०१६ नाशिक दिनांक १३/४/२०१६
६) चौकशी अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (निरंतर) यांचे कडील चौकशी अहवाल क्रमांक शिअ/निशि/जिपना/आस्था/चौकशी/१८५/२०१७ दिनांक २१/५/२०१७
७) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नाशिक यांचे दालनात झालेली सुनावणी दि.२४/७/२०१७

---

**शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक**
**जा.क्र.शिक्षण/प्राथ-९८७८/२०१७**
**नाशिक दिनांक२६/७/२०१७**

**आदेश**

ज्याअर्थी श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा कसबे सुकणे नं.२ ता.निफाड येथे कार्यरत असतांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २००६-२००७ मधील मंजुर जिल्हा परिषद शाळा बांधकामात निकृष्ठ केलेल्याकामा बाबत संदर्भ क्र.३ अन्वये श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक यांचे कडून रक्कम रुपये १,१८,०६७/-अक्षरी रुपये एक लाख अठरा हजार सदुसष्ट मात्र ) ची वसुती तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा(शिस्त व अपिल) नियम १९६४ वर नियम ४ (२) नुसार श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक यांचे दोन वेतनवाढी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने कायमस्वरुपी बंद करण्यात आलेल्या आहेत.

ज्याअर्थी श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक यांनी संदर्भ क्र.३ च्या आदेशाविरोधात मा.अप्पर आयुक्त,नाशिक यांचेकडेस महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ वे नियम १३ व १४ नुसार अपिल दाखल केलेले होते.

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक ४ अन्वये मा.अप्पर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांनी श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक यांचे अपिला बाबत दिनाक ३०/११/२०१५ रोजी निकाल पत्र पारीत केले असुन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांनी प्रकरणी नियमानुसार फेरचौकशी करुन तसेच वरील मुद्यांचा विचार करुन अपिलार्थीला बचावाची संधी देऊन दोषसिध्दीच्या प्रमाणातच शास्तीचे आदेश पारीत करावे.तो पर्यंत विवादीत आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/७६०/२०१३ दिनांक १३/१२/२०१३ हा स्थगित ठेवण्यात येतो.

ज्याअर्थी मा.अप्पर आयुक्त,नाशिक विभाग नाशिक यांचे कडील आदेशाप्रमाणे संदर्भ क्रमांक ५ नुसार शिक्षणाधिकारी (निरंतर) यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. चौकशी अधिकारी यांनी प्रकरणी चौकशी करुन संदर्भ क्रमांक ६ नुसार चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला आहे. सदर चौकशी अहवालामध्ये चौकशी अधिकारी यांनी श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक यांचे वरील आरोप सिध्द होत नाही असा अहवाल देऊन वसुली तत्कालीन तांत्रीक तसेच प्रशासकिय यंत्रणेकडून वसुल करावे असा अहवाल सादर केलेला आहे.

त्याअर्थी माझे दालनात दिनांक २४/७/२०१७ रोजी सायं.५.०० वाजता प्रकरणी सुनावणी लावुन चौकशी अधिकारी यांनी सदर प्रकरणी एकाच पक्षाची बाजु मांडले बाबत सिध्द झाले असल्याने सदर प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी,मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक यांची खालील प्रमाणे फेर आदेश देण्यात येत आहे. सन २००६-२००७ मधील मंजुर जिल्हा परिषद शाळा बांधकामात निकृष्ठ केलेल्याकामा बाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा(शिस्त व अपिल) नियम १९६४ वर नियम ४ (२) नुसार यांचे दोन वेतनवाढी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने कायमस्वरुपी बंद करण्यात येत आहे व निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी धरण्यात येत आहे. तसेच एकुण वसुलपात्र रक्कम रुपये ४,७२,२७०/-अक्षरी रक्कम रुपये चार लाख बाहत्तर हजार दोनशे सत्तर मात्र खालील प्रमाणे समान वसुली करण्यात यावी.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | पद | वसुलीपात्र रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री.नाना वसंत गंगावणे | मुख्याध्यापक | रु.९४,४५४/- |
| २ | श्रीम.नुतर भास्कर जाधव | तत्कालीन मुख्याध्यापक | रु.९४,४५४/ |
| ३ | श्रीम.प्रमिला सस्कर | तत्कालीन सरपंच | रु.९४,४५४/ |
| ४ | श्री.ठाकरे हरी धोंडु | तत्कालीन केंद्रप्रमुख | रु.९४,४५४/ |
| ५ | श्री.दिलीप काळे | तत्कालीन कनिष्ठ अभियंता | रु.९४,४५४/ |
| | | एकुण | रुपये ४,७२,२७०/- |

सदर आदेशाची नोंद श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक यांचे मुळसेवा पुस्तकात घेण्यात यावी.

२६/०७

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रति, :- श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक जि.प.शाळा कसबे सुकणे नं.२ ता.निफाड जि.नाशिक

प्रत :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती,निफाड/गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती निफाड
२/- वरील रक्कम रुपये ४,७२,२७०/-अक्षरी रुपये चार लाख बाहत्तर हजार दोनशे सत्तर वसुल करुन सर्व शिक्षा अभियान जिल्हा परिषद नाशिक यांचे कडेस भरणा करण्याची कार्यवाही आपले स्तरावरुन करण्यात यावी.तसेच समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडल्या असुन त्यापैकी १ प्रत श्री.नाना वसंत गंगावणे मुख्याध्यापक यांना बजावून दुस-या प्रतीवर दिनांकीत स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

२६/०७

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**वाचा** :-१) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील ज्ञापन शिक्षण/प्राथ-९/१०७/२०१२ दि.१४/६/२०१२

२) गटशिक्षण अधिकारी पं.स.नाशिक यांचेकडील पत्र क्र पसई/शिक्षण/अस्था-२/६०१/१५ दिनांक इ ३०/१०/२०१५

३) श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण प्राथ शिक्षक यांचा दिनांक १६/१०/२०१५

४) या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/२९६/१७ नाशिक दिनांक ११/४/२०१७

५) श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण प्राथ शिक्षक यांचा दिनांक १८/४/२०१७

६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचे कडील सुनावणी दिनांक २४/७/२०१७

७) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :-

---

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
जा.क्र.शिक्षण/प्राथ-९/[illegible]/२०१७
नाशिक दिनांक: २८/७ /२०१७

## आदेश

ज्याअर्थी श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण,प्राथमिक शिक्षक जि.प.शाळा अप्परपेठ ता.ईगतपूरी येथे काम करीत असतांना दिनांक १०/१/२००९ वारंवार गैरहजर राहणे,सन २००९-१० मध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नूकसान करणे,दप्तर अभिलेख अदयावत न ठेवणे, शालेय कामकाज असमाधानकारक असणे, तात्पुरता अपहार करणे,याव्दारे तुम्हा महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे कलम ३ चा भंग केला आहे.

ज्याअर्थी श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण, प्राथमिक शिक्षक यांनी शासकिय कामकाजात गैरवर्तणूक व नियम बाहय वर्तन केल्याने या व्दारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे कलम ३ चा भंग केल्याचे गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती ईगतपूरी यांनी निदर्शनास आणून दिल्याने या कार्यालयाचे पत्र क्रमांक /प्राथ-९/१०७/२०१२ दि.१४/६/२०१२ नुसार ज्ञापन देऊन खुलासा मागविण्यात आला होता.

ज्याअर्थी श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण, प्राथमिक शिक्षक यांनी सदर ज्ञापनास दिनांक १६/१०/२०१५ रोजी खुलासा सादर केलेला आहे. दोषारोप क्रमांक १ अंशत: मान्य केलेला आहे. दोषारोप क्रमांक २ अमान्य केलेला आहे. दोषारोप क्रमाक ३ ते ५ दिनांक ४/११/२०१२ रोजी आपले शाळेत चोरीची घटना घडल्याने पोलीस स्टेशन ईगतपूरी यांचेकडेस FIR दाखल केलेली आहे. त्यामुळे सदर आरोप सिध्द होवु शकत नाही.

ज्याअर्थी तुम्ही आरोप क्रमांक १ अनाधिकृत गैरहजर राहणे मान्य केल्याने म्हणजेच आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा वर्तणुक नियम १९६७चे नियम ३ नुसार सचोटी व कर्तव्य पालन केल्याचे दिसुन येत नाही.या आरोपावरुन आपणास शासन होणे ही धारणा पक्की झाली आहे.

ज्याअर्थी तुम्ही दिनांक ३१/१/२०१६ रोजी नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त झाले असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम २७ नुसार सेवानिवृत्ती वेतन रु.१००/- ने तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षाकरीता का बंद करण्यात येवू नये ? तसेच अनाधिकृत गैरहजर कालावधी दि.१०/१/२००९, दि. १२/१/२००९, दि.९/४/२००९, दि.२९/४/२००९ ते दि.३०/४/२००९ दि.१/५/२००९ ते दि.६/५/२००९ दि.२३/६/२००९ ते दि.३०/६/२००९ दि.१/७/२००९ तेदि.२०/७/२००९ दि.२९/८/२००९,दि.३१/८/२००९ दि.१/८/२००९ते दि.५/९/२००९ दि.१०/९/२००९ ,दि.२३/९/२००९, दि.११/११/२००९,दि.१४/११/२००९, दि.१९/१२/२००९, दि.२६/१२/०९ दि.२/१/२०१०, दि.६/३/२०१०, दि.१२/३/२०१० ते दि.१२/६/२०१० दि.६/७/२०१०ते दि.२१/९/२०१०दि.१/१०/२०१० ते दि. १७/८/२०१२ (एकू ण दिवस ९०३) असाधारण रजा विनावेतन (अकार्यदिन) तसेच सदर कालावधी सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राहय न धरता सेवानिवृत्ती वेतन का मंजूर करु नये ? याबाबतचा आपला लेखी खुलासा ही नोटीस मिळालेपासून २१ दिवसांचे आंत पुराव्याचे दस्तऐवजांसह इकडेस सादर करावा.या बाबत या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/ प्राथ-९/२९६/१७ नाशिक दि. ११/४/२०१७ अन्वये देण्यांत येवून त्याबाबतचा खुलासा २१ दिवसांच्या आंत सादर करणे बाबत कळविण्यात आलेले होते.

ज्याअर्थी प्रस्तुत अंतिम कारणे दाखवा नोटीस पत्रास श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण ,सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक यांनी दिनांक १८/४/२०१७ रोजी खुलासा सादर केला आहे. श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने तसेच आपणास माझे दालनात सदर प्रकरणी दिनांक २४/७/२०१७ रोजी सायं.५.०० वाजता सुनावणी घेऊन आपणास बचावा बाबत अंतीम संधी देण्यात आली होती.आपण आपली बाजु समर्पक पणे मांडू शकले नसल्याने आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द होते.

त्याअर्थी श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक यांना त्यांचेविरुध्द्चे खातेचौकशी प्रकरणी शासन होणेबाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम २७ नुसार सेवानिवृत्ती वेतन ५ % कायमस्वरुपी बंद करण्यात येत आहे.तसेच अनाधिकृत गैरहजर कालावधी दि.१०/१/२००९, दि. १२/१/२००९, दि.९/४/२००९, दि.२९/४/२००९ ते दि.३०/४/२००९ दि.१/५/२००९ ते दि.६/५/२००९ दि.२३/६/२००९ ते दि.३०/६/२००९ दि.१/७/२००९ ते दि.२०/७/२००९ दि.२९/८/२००९,दि.३१/८/२००९ दि.१/८/२००९ते दि.५/९/२००९ दि.१०/९/२००९ ,दि.२३/९/२००९,दि.११/११/२००९,दि.१४/११/२००९, दि.१९/१२/२००९, दि.२६/१२/०९ दि.२/१/२०१०, दि.६/३/२०१०, दि.१२/३/२०१० ते दि.१२/६/२०१० दि.६/७/२०१०ते दि.२१/९/२०१०दि.१/१०/२०१० ते दि. १७/८/२०१२ (एकूण दिवस ९०३) असाधारण (विनावेतन) रजा म.ना.से.(रजा) नियम १९८१ चे कलम६३ (६) नुसार अकार्यदिन करण्यात येत आहे. तसेच सदर कालावधी सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राहय धरण्यात येवू नये .

प्रस्तूत आदेशाची नोंद श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण ,सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक यांचे मूळ सेवापुस्तकांत घेण्यात यावी.

Deepa 26/10

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,** श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण ,सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक जिल्हा परिषद शाळा अप्पर पेठ ता.ईगतपूरी जि.नाशिक

**प्रतः-** गटशिक्षणअधिकारी पंचायत समिती ईगतपूरी.

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असून त्यापैकी १ प्रत श्री.जगन्नाथ लकडू चव्हाण ,सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

**प्रतः-** प्राथमिक -९ शिक्षण विभाग जि.प.नाशिक

Deepa 26/10

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद नाशिक**